


नाशिक जिल्ह्यातील सर्वाधिक खपाचे पहिले सायंदैनिक

किंमत २

# भ्रमर

BHRAMAR




वर्ष ५३ वे, अंक ४७
Year : 53, Issue No. : 47

नाशिक, शुक्रवार दि. २७ जून २०२५
Nashik, Friday 27 June 2025

R.N.I. Regd. No.20904/72
Postal Reg. No. NSK/16/2024-2026

पाने ६, किंमत २ रुपये
Pages : 6, Price Rs. 2

## तहसीलदारपदाच्या नोकरीचे आमिष दाखवून तरुणाची बारा लाखांची ऑनलाईन फसवणूक

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :- तहसीलदारपदाची सरकारी नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून तीन जणांनी एका तरुणाला बारा लाख रुपयांचा ऑनलाईन गंडा घातल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की फिर्यादी अक्षय अनिल झंवर (रा. निर्मम उपवन, ढिकलेनगर, पंचवटी) यांच्याशी आरोपी अतुल पेठकर, वजीर हुजावर व सोनाली मॅडम नामक महिला अशा तिघा जणांनी संपर्क साधला. फिर्यादी झंवर यांचा विश्वास संपादन करून त्यांची फसवणूक करण्याच्या उद्देशाने झंवर यांना तहसीलदारपदाची सरकारी नोकरी लावून देण्याचे आमिष दाखविले.

त्यानंतर झंवर यांच्याकडून या तीनही आरोपींनी जानेवारी २०२४ ते २६ जून २०२५ या कालावधीत हॉटेल एसएसकेसमोर गोल्फ क्लब मैदान येथे रोख व ऑनलाईन स्वरूपात एकूण १२ लाख रुपये घेतले; मात्र नोकरी लावून दिली नाही, तसेच घेतलेले पैसे परत न करता झंवर यांची फसवणूक करून त्यांनी दिलेल्या रकमेचा अपहार केला.

या प्रकरणी मुंबई नाका पोलीस ठाण्यात अतुल पेठकर, वजीर हुजावर व सोनाली मॅडम यांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गोडे करीत आहेत.

## रामकुंडावर भाविकांच्या बॅगांमधून ८ मोबाईलसह रोकड लंपास

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** दर्शनासाठी आलेले भाविक स्नानासाठी रामकुंड येथे गेले असता अज्ञात चोरट्याने त्यांच्या बॅगांमधून ८ मोबाईल व ४० हजार रुपये चोरून नेल्याची घटना रामकुंड परिसरात घडली.

याबाबत पोलिसांनी दिलेली अधिक माहिती अशी की, फिर्यादी शिवदयालसिंग मुलसिंग शेखावत (वय ६९, रा. जगदीशपुरी कॉलनी, जयपूर) हे काही भाविकांसमवेत रामकुंड परिसरात दर्शनासाठी आले होते. काल पहाटे ४ ते साडेचार वाजेच्या दरम्यान ते सर्व आपल्या बॅगा बसमध्ये ठेवून आंघोळीसाठी रामकुंड परिसरात गेले होते. त्यावेळी अज्ञात चोरट्यांनी बसमध्ये प्रवेश करून ४० हजार रुपये रोख व ४५ हजार रुपये किंमतीचे ८ मोबाईल असा एकूण ८५ हजार रुपयांचा ऐवज चोरुन नेला. याप्रकरणी शेखावत यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध पंचवटी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शेवाळे करीत आहेत.

## गळफास देऊन मुलाचा खून

### आईवडिलांसह दाजीच्या विरोधात गुन्हा दाखल

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :- नेहमी दारू पिऊन आईवडिलांसह पत्नीला शिवीगाळ करणाऱ्या मद्यपी मुलाला ओढणीने गळफास देऊन त्याचा खून केल्याप्रकरणी तिघा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

याबाबत पूजा विशाल पाटील (रा. शिवाजीनगर, सातपूर) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात म्हटले, की दि. २५ जून रोजी सकाळी ११ वाजता त्यांचे पती विशाल पाटील यांनी त्यांना कामावर सोडले. त्यानंतर विशाल पाटील हा दारू पिऊन घरी आला होता व त्याने दारूच्या नशेत वडील गोकुळ पाटील, आई शशिकला पाटील व नंदोई उमेश काळे यांना दारूच्या नशेत शिवीगाळ व मारहाण केली, तसेच विशाल हा नेहमीच दारू पिऊन आईवडिलांबरोबरच पत्नीलाही शिवीगाळ व मारहाण करीत असे, तसेच दारू पिण्यासाठी पैसे न मिळाल्यास तो घरातील वस्तू विकत असे. या त्रासाला कंटाळून त्याचे वडील गोकुळ पाटील व त्याचे दाजी उमेश काळे यांनी विशाल पाटील याच्या गळ्याला दोन्ही बाजूंनी ओढणी बांधून ओढले व आई शशिकला पाटील हिने विशाल पाटील याचे हात पकडून त्याचा आवाज दाबण्याकरिता त्याच्या तोंडावर उशी दाबून त्याला जिवे ठार मारले.

या प्रकरणी मयत विशाल पाटीलची पत्नी पूजा पाटील यांनी गंगापूर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार तिघा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला येऊन मृताचे वडील व दाजी यांना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक महाजन करीत आहेत.

## मराठी माणसासाठी राज–उद्धव एकत्र

**मुंबई (भ्रमर वृत्तसेवा) :-** राज्यातील शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी सक्तीच्याविरोधात ५ जुलै रोजी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या मोर्चात मनसेप्रमुख राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे एकत्र येणार आहेत. ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी आज ही घोषणा केली. तसेच मला काल राज ठाकरेंचा फोन आला होता, अशी माहिती संजय राऊतांनी दिली.

राज ठाकरे यांनी मला फोन केला. मराठी भाषेसाठी दोन मोर्चे निघणे योग्य नाही. एकच मोर्चा निघायला हवा, असे राज ठाकरे म्हणाले, अशी माहिती संजय राऊत यांनी दिली. याबाबत उद्धव ठाकरेंना मी बोललो की, मला राज ठाकरेंचा फोन आला होता. त्यानंतर उद्धव ठाकरेसुद्धा आढेवेढे न घेता तयार झाले. मराठी ऐक्य दिसले पाहिजे, असे उद्धव ठाकरे म्हणाले. ६ तारखेला मनसे पुरस्कृत मोर्चा होता. मी परत राज ठाकरे यांना फोन करून सांगितले की, आषाढी एकदशी आहे. त्यामुळे राज ठाकरेंनी ५ जुलै ही तारीख ठरवल्याचे संजय राऊतांनी सांगितले.



मला राज ठाकरे यांचा फोन आला. त्यांनी त्यांची भूमिका सांगितली. मराठी माणसाचे दोन मोर्चे निघणे बरे दिसत नाही. एकत्र आंदोलन झाले तर प्रभाव पडेल. अशी भूमिका त्यांनी मांडली. मी उद्धव ठाकरेंना राज ठाकरे जे काही बोलले ते सांगितले. यावर उद्धव ठाकरे म्हणाले मराठीचे ऐक्य दिसणे गरजेचे आहे. त्यानंतर दोघांनीही एकत्र मोर्चा काढण्याचे ठरवले. दोघांचा मोर्चा ५ तारखेला निघेल.

ठाकरे बंधूंचे मामा चंदूमामा वैद्य यांनी म्हटले आहे की, आनंदाची गोष्ट आहे, मी तेच सांगितले की कालाय तस्मै नम: आता जेव्हा ईश्वराची इच्छा असते तेव्हा हे जुळून आले आहे. मराठीसाठी हे दोघे एकत्र येणे आनंदाची गोष्ट आहे.मराठी माणसाचे हित या दोघांच्या माध्यमातून व्हावे, अशी मी प्रार्थना करतो. शेवटी दोन्ही भाचे असल्याने आनंद आहे मामा म्हणून आनंद आहे. मी राजकारणात पडत नाही, पण दोघे एकत्र आले तर माझा त्याला पाठिंबा आहे. अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे.

## सिगारेटचे पैसे देत नसल्याचे समजून दोघांवर प्राणघातक हल्ला

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** सिगारेटचे पैसे न दिल्याच्या रागातून दोन युवकांना जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना पंचवटी परिसरात घडली.

याबाबत पोलिसांनी दिलेली अधिक माहिती अशी की, फिर्यादी अनंता राजेंद्र पाटील (वय २४, रा. पंचवटी, नाशिक) हा त्याचा मित्र ऋतिक बाळासाहेब डोंगरे (वय २२) याच्यासोबत दि. २५ जून रोजी सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास पंचवटीतील अमरधाम गार्डनच्या कोपऱ्यावर एका पानटपरीजवळ सिगारेट घेऊन उभे होते. त्यावेळी आरोपी मयूर उर्फ मया शिवाजी घातके, अत्तर बादशहा व बंटी असे तिघे त्यांच्याजवळ आले. तुम्ही सिगारेटचे पैसे का देत नाही, असे म्हणत अत्तर व बंटी यांनी फिर्यादी व त्याच्या मित्राला शिवीगाळ करुन मारहाण केली. त्यावेळी मयूरने त्याच्या कमरेला लावलेला चाकू काढून ऋतिकच्या पोटात खुपसून त्याला गंभीर जखमी केले. त्यावेळी त्याला वाचवण्यासाठी फिर्यादी अनंता पाटील मध्ये पडले असता मयूरने त्याच चाकूने अनंताच्या पोटात चोकू खुपसून त्यालाही जखमी केले. याप्रकरणी अनंता पाटील यांच्या फिर्यादीवरुन पंचवटी पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, तिघांना पोलिसांनी अटक केली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक नेमाणे करीत आहे.

## १३ लाख रुपयांसाठी विवाहितेचा छळ, पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** पतीच्या व्यवसायासाठी तीन लाख रुपये व नोकरीसाठी दहा लाख रुपये माहेरून आणले नाहीत म्हणून विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी पतीसह पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की फिर्यादी विवाहिता ही दि. १३ डिसेंबर २०१८ ते दि. ११ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत म्हसरूळ येथे सासरी नांदत होती. त्यावेळी विवाहितेचा पती, सासू, सासरे व नणंद यांनी संगनमत करून विवाहितेच्या पतीला व्यवसाय करण्यासाठी माहेरून तीन लाख रुपये व नोकरीसाठी दहा लाख रुपये आणावेत, अशी मागणी केली, तसेच मुलाऐवजी मुलगी झाली, या कारणावरून कुरापत काढून विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केला, तसेच हाताच्या चापटीने मारहाण, शिवीगाळ व दमदाटी करून फिर्यादी विवाहिता व तिच्या मुलीचा त्याग केला. म्हसरूळ पोलीस ठाण्यात पतीसह पाच जणांविरुद्ध छळवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## महिलेचा फोटो मॉर्फ करून विनयभंग

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** फेसबुकवरील छायाचित्राचे स्क्रीनशॉट घेऊन व मॉर्फ करून ते व्हायरल करून ऑनलाईन करून विनयभंग केल्याप्रकरणी एका तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सायबर पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की पोलिसांनी दीपक सूर्यवंशी (रा. मोटकरी एनक्लेव्ह, गोविंदनगर, मूळ रा. कल्याण, जि. ठाणे) याने दि. ७ ते ९ जूनदरम्यान फिर्यादी महिलेच्या फेसबुक अकाऊंटवर असलेल्या छायाचित्रांचे स्क्रीनशॉट घेऊन ते मॉर्फ केले. त्यानंतर मॉर्फ केलेले छायाचित्र त्याच्या स्वत:च्या फेसबुक अकाऊंटवरून प्रसारित करून फिर्यादी महिलेविषयी अश्लील कमेंट करून त्यांचा लैंगिक छळ केला व स्त्रीमनास लज्जा उत्पन्न होईल, असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. या प्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात दीपक सूर्यवंशी याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## किराणा मालाची ऑर्डर न देता डिलिव्हरी बॉयकडून महिलेचा विश्वासघात

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** अॅमेझॉन कंपनीकडे किराणा माल व घरगुती वस्तूंच्या ऑनलाईन ऑर्डर्स टाकण्यास सांगून त्या वस्तू न देता महिलेचा विश्वासघात केल्याप्रकरणी एका डिलिव्हरी बॉयविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की फिर्यादी भाग्यश्री अनिल मुसळे ऊर्फ भाग्यश्री केतन बधान (रा. राजपाल कॉलनी, मखमलाबाद नाका, नाशिक) या मार्केट यार्डजवळील लॉजिस्टिक हब एजन्सीमध्ये कामास असताना ग्राहकांच्या ऑर्डर्स त्यांच्याकडे पाठवून पुन्हा त्यांना पैसे परत पाठविले व त्यांना फोन करून स्वत:चा क्यूआर कोड, बँक अकाऊंट नंबर देऊन त्यावर ग्राहकांकडून पैसे घेतले, तसेच आरोपी अभिजित भिसे (रा. अमृतधाम, पंचवटी) याने, तसेच त्यांचे मित्र व त्याच्या ओळखीच्या व्यक्तींना अॅमेझॉन कंपनीकडे किराणा माल व घरगुती वस्तूंच्या ऑनलाईन ऑर्डर्स टाकण्यास सांगितले. त्यांना या ऑर्डरच्या बदल्यात जास्त वस्तू पाठविल्या व पुन्हा त्यांना त्यांच्याच ऑर्डर्सचा रिफंडसुद्धा पाठवून फिर्यादीचा विश्वासघात केला, तसेच स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी आरोपी अभिजित भिसे याने फसवणूक करून ३ लाख २७ हजार रुपयांचा अपहार केला. याबाबत त्याच्याकडे विचारणा केली असता त्याने फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी देऊन शिवीगाळ केली, तसेच काम सोडून निघून गेला. या प्रकरणी पंचवटी पोलीस ठाण्यात अभिजित भिसे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक चव्हाण करीत आहेत.

## अतिक्रमणमध्ये शंभर कर्मचाऱ्यांचे आउटसोर्सिंग

### सात संस्थांत चढाओढ : खुली होणार आज निविदा

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** अपुऱ्या मनुष्यबळामुळे अतिक्रमण निर्मूलन मोहिमेवर कमालीचा परिणाम होत असल्याने नाशिक महानगरपालिका प्रशासनाने आउटसोर्सिंगवर मनुष्यबळ घेण्याचा निर्णय घेतला. सहा विभागांकरिता शंभर कर्मचारी घेण्यासाठी निविदा प्रक्रिया राबवली जात आहे. या कामासाठी सात संस्थांमध्ये चढाओढ असून, आज या कामाची निविदा खुली केली जाणार आहे.

शहरात अतिक्रमण फोफावत असल्याने त्याचा फटका द्वारकासह मध्यवर्ती भागातील सीबीएस, मेनरोड, रविवार कारंजा, कॉलेजरोड, शरणपूर रोड आदी भागांत बसत आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या दृष्टीने अतिक्रमण विभागावर महत्त्वाची जबाबदारी असेल. नोकरभरती न झाल्याने कामाचा अतिरिक्त ताण अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांवर पडतो आहे.

> शहराचा विस्तार झपाट्याने वाढत असताना वाढते अतिक्रमण प्रशासनासाठी डोकेदुखी ठरत आहे. महत्त्वाचे म्हणजे, अतिक्रमणांमुळे शहराचे विद्रूपीकरण होते. आउटसोर्सिंगद्वारे शंभर मनुष्यबळ घेतले जाणार आहे. यासाठी निविदाप्रक्रिया राबवली जात आहे. आज निविदा खुली होणार आहे.
>
> – सुवर्णा दखणे, उपायुक्त, अतिक्रमण विभाग, मनपा, नाशिक.

शहरातील अतिक्रमणां विरोधात मोहीम अधिक तीव्र केली जाणार असून, याकरिता मनुष्यबळाची आवश्यकता भासत आहे. त्यादृष्टीने प्रशासनाकडून आउटसोर्सिंगद्वारे कर्मचारी घेऊन नियोजन केले जात आहे. नाशिक महानगरपालिकेच्या भरतीवर अनिश्चिततेचे ढग आहेत. उपलब्ध मनुष्यबळात शहर अतिक्रमणमुक्त ठेवणे एक कसोटी ठरत आहे. त्यामुळे अतिक्रमण विभागाने आउटसोर्सिंगद्वारे मनुष्यबळ भरण्याचा निर्णय गेल्या वर्षी घेतला होता.

शहरातील खासगी व नाशिक महानगर पालिकेच्या मिळकतीवरील अनधिकृत बांधकामे हा देखील महापालिकेसाठी डोकेदुखीचा विषय ठरत आहे. अतिक्रमण काढण्यापूर्वी नगररचना विभागाकडून ले-आउट दिला जातो. त्यानुसार अनधिकृत बांधकाम काढले जाते. यात अभियंत्यांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते.

## राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रमांतर्गत १० संस्थांशी सामंजस्य करार

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी):-** राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण व दृष्टिहीनता प्रतिबंधक कार्यक्रम अंतर्गत नाशिक जिल्ह्यातील नागरिकांना दर्जेदार, मोफत नेत्रसेवा उपलब्ध व्हावी, यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले. जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण समिती नाशिक आणि विविध नामांकित अशासकीय व खाजगी नेत्ररोग संस्थांमध्ये सामंजस्य करार करण्यात आला.

या करारानुसार ३१ मार्च २०२७ पर्यंतच्या कालावधीत मोफत नेत्रशस्त्रक्रिया, उपचार व नेत्रदान जनजागृती या सेवा संबंधित संस्थांच्या माध्यमातून राबविल्या जाणार आहेत. या उपक्रमामुळे दूरवरच्या ग्रामीण व दुर्गम भागातील गरजू नागरिकांना मोफत व दर्जेदार नेत्रसेवा सहज उपलब्ध होणार असून विशेषतः मोतीबिंदू, काचबिंदू, मागच्या पडद्याच्या, समोरच्या नेत्र बुब्बुळाच्या, तिरळेपणाच्या शस्त्रक्रिया व इतर नेत्र रोगावर हा उपक्रम अत्यंत लाभदायक ठरणार आहे.

या सामंजस्य कराराबाबत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांची मान्यता घेऊन हे करार अंतिम करण्यात आले आहेत.

### करार केलेल्या संस्था खालीलप्रमाणे

१) तुलसी आय हॉस्पिटल नाशिक २) एसएमबीटी इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्स रिसर्च सेंटर, धामणगाव, ता. इगतपुरी ३) गोंधळे हॉस्पिटल, नाशिक ४) सुशिल आय केअर, नाशिक ५) कल्पतरु फाऊंडेशन, नाशिक ६) केकाण हॉस्पिटल, नाशिक ७) रोटरी चॅरिटी ट्रस्ट – बी. एस. भंडारी रोटरी आय हॉस्पिटल, मालेगाव ८) बिर्ला आय हॉस्पिटल, नाशिक ९) श्री गुरुजी रुग्णालय, नाशिक १०) डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय व संशोधन केंद्र, नाशिक.

जिल्ह्यातील ग्रामीण व दुर्गम भागातील गरजू नागरिकांनी या संस्थांमधून मोफत नेत्रसेवेचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे. या करारासाठी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. चारुदत्त शिंदे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे यांनी प्रयत्न केले. यावेळी अंधत्व नियंत्रण व दृष्टीहिनता विभागाचे कार्यक्रम व्यवस्थापक, जिल्हा रुग्णालय नाशिक डॉ. शशिकांत आवारी उपस्थित होते.

## इंदिरा गांधी यांनी सत्तेच्या लालसेपोटी आणीबाणी लादली : डॉ. भारती पवार




**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी):-** तत्कालिन पंतप्रधान स्व.इंदिरा गांधी यांनी सत्तेच्या लालसेपोटी लोकशाहीची हत्या करुन जनतेचे हक्क काढून न्याय व हक्कापासून वंचित ठेवून आणीबाणी लादली असल्याचे प्रतिपादन माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांनी केले.

भारतीय जनता पार्टी कार्यालय वसंतस्मृती येथे पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. आणीबाणी २१ महिन्यांच्या कालावधीच्या कालखंडाविषयी बोलताना त्या म्हणाल्या की, इंदिरा गांधी यांची १९७१ मध्ये लोकसभेवर झालेली निवड अलाहाबाद उच्च न्यायालयाने रद्द ठरविली. निवडून येण्यासाठी इंदिरा गांधी यांनी भ्रष्ट मार्गाचा अवलंब केला, असे न्यायालयाने स्पष्टपणे म्हटले होते. न्यायालयाच्या निकालानंतर पंतप्रधानपद सोडावे लागले, म्हणून इंदिरा गांधी यांनी २५ जून १९७५ साली आणिबाणी लादली. या निर्णयाची कल्पना केंद्रीय मंत्रिमंडळाला देण्यात आली नव्हती. २५ जूनच्या मध्यरात्री आणिबाणी लादली गेली. २६ जून रोजी सकाळी केंद्रीय मंत्रिमंडळाला त्याची माहीती दिली गेली.

अटलबिहारी वाजपेयी, लोकनायक जयप्रकाश नारायण, राजनाथ सिंह यांना तातडीने अटक करण्यात आली. देशभरात १.४ लाख लोकांना तुरूंगात डांबण्यात आले. तुरूंगात असताना २२ जणांचा मृत्यू झाला. प्रसार माध्यमांवर निर्बंध (सेन्सॉरशिप), प्रसार माध्यमांचा छळ वृत्तपत्रांचे प्रकाशन होऊ नये यासाठी २५ जून रोजी दिल्लीत पहाटे २ च्या सुमाराला वीज पुरवठा खंडीत करण्यात आला. इंदिरा गांधी यांच्या निवडणूक खटल्याचे वृत्त प्रकाशित होऊ नये, यासाठी प्रसार माध्यमांना सूचना दिल्या गेल्या.

आणीबाणीच्या कालावधीत घटना अक्षरश: पायदळी तुडवली गेली असून सत्ता टिकविण्यासाठी अनेक कायद्यांमध्ये बदल करण्यात आले. 'मिसा' खाली अटक करण्यात आलेल्या कैद्यांची सुटका होऊ नये, यासाठी कायद्यात बदल केले गेले. संसदीय कामकाज वृत्त कायदा तसेच प्रेस कौन्सील कायदा रद्द करण्यात आला. वृत्तपत्रांनी सरकार विरोधात बातम्या छापू नयेत, लेख लिहू नयेत यासाठी कायदा तयार करण्यात आला. घटनेची गळचेपी करण्यात आली. ३८ वी घटना दुरूस्ती करून आणीबाणीविरोधात याचिका दाखल करून घेण्यास बंदी करण्यात आली. लोकशाहीने दिलेल्या मुलभूत हक्कांची गळचेपी करण्याविरूध्द न्यायालयात दाद मागता येणार नाही, अशी तरतूद घटना दुरुस्तीद्वारे केली गेली. ३९ वी घटना दुरूस्ती करून पंतप्रधान, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती यांच्या निवडीविरूध्द सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यास बंदी केली गेली. इंदिरा गांधीचे पंतप्रधान पद कायम ठेवण्यासाठी ही दुरूस्ती केली गेली. इंदिरा गांधी यांच्या निवडणुकीविषयी खटल्याची सुनावणी सुरू होण्यापूर्वी ४ दिवस आधी ही दुरूस्ती करण्यात आली.

घटनेचे उल्लंघन करण्यात आले. ४० व्या घटना दुरूस्तीद्वारे आणीबाणी विरोधात न्यायालयात दाद मागण्यास प्रतिबंध करण्यात आला. ४१ व्या घटना दुरूस्तीद्वारे पंतप्रधान आणि राष्ट्रपती यांच्याविरोधात सत्ता काळात असतानाच्या निर्णयाबद्दल न्यायालयात दाद मागण्यास बंदी करण्यात आली.

४२ व्या घटना दुरूस्तीद्वारे घटनेत दुरूस्त्या करण्याचे, कायदे रद्द करण्याचे अनिर्बंध अधिकार संसदेला देण्यात आले. संसदेत कायदा बदलण्यासाठी बहुमताची आवश्यकता अनिवार्य करणारा कायदा रद्द केला गेला. एका खासदारालाही कायदा संमत करण्याचा अधिकार दिला गेला ! समाजवाद आणि सेक्युलर हे शब्द घटनेच्या परिशिष्टात घुसडले गेले. न्यायालयाच्या अधिकारांवर बंधने आली. घटना दुरूस्तीबाबत प्रश्न उपस्थित करण्याचा अधिकार न्यायालयांकडून काढून घेतला गेला. (पान ६ वर)

## गोदावरी नदीत वाहून जाणाऱ्या दोघांचा वाचविला जीव

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** गोदावरी नदीच्या वाहत्या पाण्यात आंघोळ करण्यासाठी उतरलेल्या राजस्थान तसेच वडाळा येथील दोघे अल्पवयीन मुले वाहून गेली. या दोघांनाही रामकुंड येथील जीवरक्षक तसेच मनपाच्या सुरक्षा दलाच्या जवानांनी काही स्थानिक नागरिकांच्या मदतीने पाण्यातून सुखरूप बाहेर काढून त्यांचा जीव वाचवला.

चार दिवसांपूर्वी झालेल्या पावसामुळे गोदावरी नदीच्या पाण्याच्या पातळीत वाढ झालेली आहे. त्यातच धरणातून पाण्याचा विसर्ग केल्याने गोदावरी नदी दुथडी भरून वाहत आहे. काल दुपारी राजस्थान येथील एक अल्पवयीन मुलगा निलकंठेश्वर मंदिर जवळ नदीपात्रात आंघोळ करण्यासाठी उतरला. मात्र त्याला त्या वाहत्या पाण्याचा अंदाज न आल्याने तो वाहून जाऊ लागला.

हा प्रसंग गंगाघाटावर कार्यरत असलेल्या जीवरक्षक गणेश उईके, अजित सडमाके, दादू उईके, अण्णा सोनवणे यांच्या लक्षात येताच त्यांनी तत्काळ पाण्यात उडी मारून त्या अल्पवयीन मुलाला पाण्यातून बाहेर काढून कुटुंबियांच्या स्वाधीन केले. या घटनेला काही तास लोटत नाही तोच सायंकाळी साडेपाच वाजता वडाळा गावातील अमन खान हा अल्पवयीन मुलगा दुतोंड्या मारुती समोरच्या नदीपात्रात वाहून जात असल्याचे गंगाघाटावर कार्यरत असलेल्या सुरक्षा रक्षक सचिन राऊत, योगेश घोडके, भास्कर बेनके, नामदेव बेनके, शितल, पगारे, महाले यांच्या निदर्शनास आले त्यांनी तत्काळ स्थानिक नागरिकांना मदतीसाठी बोलावून पाण्यात वाहून जाताना या मुलाला वाचवले.

# Form A
# Loknete Dattaji Patil Sahakari Bank Ltd. Lasalgaon (Nashik)
## Balance Sheet As On 31 March 2025

| | Schedule | As on 31.03.2025 (Current Year) | As on 31.03.2024 (Previous Year) |
|---|---|---|---|
| **Capital & Liabilities** | | | |
| Capital | 1 | 56,076,700.00 | 48,476,000.00 |
| Reserve and Surplus | 2 | 334,123,017.66 | 307,699,651.47 |
| Deposits | 3 | 2,745,069,082.63 | 2,472,626,878.41 |
| Borrowings | 4 | - | - |
| Other Liabilities and Provisions | 5 | 40,518,945.58 | 47,003,855.64 |
| **Total** | | **3,175,787,745.87** | **2,875,806,385.52** |
| **Assets** | | | |
| Cash and Balance with RBI | 6 | 89,882,231.00 | 96,766,847.00 |
| Balance with Banks and Money at Call and Short Notice | 7 | 56,014,952.16 | 57,216,164.26 |
| Investments | 8 | 1,530,854,382.06 | 1,405,941,687.59 |
| Advances | 9 | 1,387,134,279.43 | 1,195,458,075.72 |
| Fixed Assets | 10 | 35,150,996.30 | 32,583,848.55 |
| Other Assets | 11 | 76,750,904.92 | 87,839,762.40 |
| **Total** | | **3,175,787,745.87** | **2,875,806,385.52** |
| Contingent Liabilities Bank Guarantee & DEAF | 12 | 17,208,950.06 | 13,947,552.33 |

### Schedule 1 - Capital

| | | As on 31.03.2025 (Current Year) | As on 31.03.2024 (Previous Year) |
|---|---|---|---|
| I | **Share Capital** | | |
| | **Authorised Capital** | | |
| | (2000000 shares of Rs. 50 Each) | **10,00,00,000.00** | **5,00,00,000.00** |
| | **Subscribed Capital** | | |
| | (1121534 shares of Rs. 50 Each) | 5,60,76,700.00 | 4,84,76,000.00 |
| | **Total** | **5,60,76,700.00** | **4,84,76,000.00** |

### Schedule 2 - Reserve and Surplus

| | | | |
|---|---|---|---|
| I | **Statutory Reserve** | | |
| | **Opening Balance** | **6,74,82,821.15** | **6,43,33,771.15** |
| | Additions during the year | 34,89,624.00 | 31,49,050.00 |
| | Deductions during the year | - | - |
| | **Total** | **7,09,72,445.15** | **6,74,82,821.15** |
| II | **Building Fund** | | |
| | **Opening Balance** | **3,87,90,600.78** | **3,03,45,116.02** |
| | Additions during the year | 39,74,460.92 | 84,45,484.76 |
| | Deductions during the year | - | - |
| | **Total** | **4,27,65,061.70** | **3,87,90,600.78** |
| III | **Investment Fluctuation Fund** | | |
| | **Opening Balance** | **3,85,63,276.27** | **4,42,10,411.27** |
| | Additions during the year | - | - |
| | Deductions during the year | - | **56,47,135.00** |
| | **Total** | **3,85,63,276.27** | **3,85,63,276.27** |
| IV | **Special Reserve U/s 36 (1)** | | |
| | **Opening Balance** | **63,18,000.00** | **59,05,000.00** |
| | Additions during the year | **10,00,000.00** | **4,13,000.00** |
| | Deductions during the year | - | - |
| | **Total** | **73,18,000.00** | **63,18,000.00** |
| V | **Member Welfare Fund** | | |
| | Opening Balance | - | 2,50,000.00 |
| | Additions during the year | - | - |
| | Deductions during the year | - | **2,50,000.00** |
| | **Total** | **-** | **-** |
| VI | **Charity Fund** | | |
| | Opening Balance | 14,284.26 | 89,490.26 |
| | Additions during the year | 1,03,000.00 | 1,05,000.00 |
| | Deductions during the year | 21,000.00 | 1,80,206.00 |
| | **Total** | **96,284.26** | **14,284.26** |
| VII | **Women Welfare Fund** | | |
| | Opening Balance | 2,90,607.00 | 21,000.00 |
| | Additions during the year | - | 2,69,607.00 |
| | Deductions during the year | - | -- |
| | **Total** | **2,90,607.00** | **2,90,607.00** |
| VIII | **Building Revaluation Reserve** | | |
| | Opening Balance | 2,26,82,738.09 | 2,38,76,566.56 |
| | Additions during the year | - | - |
| | Deductions during the year | 11,34,136.91 | 11,93,828.47 |
| | **Total** | **2,15,48,601.18** | **2,26,82,738.09** |
| IX | **BDDR 2024** | | |
| | Opening Balance | 1,08,52,000.00 | - |
| | Additions during the year | - | 1,08,52,000.00 |
| | Deductions during the year | - | - |
| | **Total** | **1,08,52,000.00** | **1,08,52,000.00** |
| X | **Reserve For Bad & Doubtful Debts** | | |
| | Opening Balance | 2,32,16,231.10 | 4,05,08,010.22 |
| | Additions during the year | 40,30,005.90 | 64,15,000.00 |
| | Deductions during the year | 12,46,237.00 | 2,37,06,779.12 |
| | **Total** | **2,60,00,000.00** | **2,32,16,231.10** |
| XI | **Contingent Provision For Standard Assets** | | |
| | Opening Balance | 50,00,000.00 | 50,00,000.00 |
| | Additions during the year | 10,00,000.00 | - |
| | Deductions during the year | - | - |
| | **Total** | **60,00,000.00** | **50,00,000.00** |
| XII | **Investment Depreciation Reserve** | | |
| | Opening Balance | 8,41,19,131.90 | 2,33,13,000.00 |
| | Additions during the year | 29,46,158.10 | 6,79,06,131.90 |
| | Deductions during the year | -- | 71,00,000.00 |
| | **Total** | **8,70,65,290.00** | **8,41,19,131.90** |
| XIII | **Balance in Profit and Loss Account** | **2,26,51,452.10** | **1,03,69,960.92** |
| XIV | **Accumulated Profit & Loss** | **-** | **-** |
| | **Totals** | **33,41,23,017.66** | **30,76,99,651.47** |

### Schedule 3 Deposits

| | | | |
|---|---|---|---|
| A. 1 | **Current Deposits** | | |
| | (i) From Institutions | - | - |
| | (ii) From Others | 4,92,98,489.11 | 4,83,89,855.36 |
| II | **Saving Bank Deposits** | **57,04,70,458.07** | **43,63,71,786.84** |
| III | **Term Deposits** | | |
| | (i) From Institutions | 25,50,54,971.00 | 43,18,93,308.00 |
| | (ii) From Others | 1,87,02,45,164.45 | 1,55,59,71,928.21 |
| | Total (I+II and III) | 2,74,50,69,082.63 | 2,47,26,26,878.41 |
| | **Total** | **2,74,50,69,082.63** | **2,47,26,26,878.41** |

### Schedule 4 Borrowings

| | | | |
|---|---|---|---|
| I | **Borrowings in India** | **-** | **-** |
| | a) Reserve Bank of India | - | - |
| | b) Other Banks | - | - |
| | c) Other Institutions and Agencies | - | - |
| II | **Borrowings outside India** | **-** | **-** |
| | **Total (I and II)** | **-** | **-** |
| | **Total** | **-** | **-** |
| | **Secured borrowings included in I and II above** | | |

### Schedule 5 Other Liabilities and Provisions

| | | | |
|---|---|---|---|
| I | Bills Payable | - | - |
| II | Inter - Office Adjustments (net) | - | - |
| III | **Interest Accured** | | |
| | 1) Overdue Interest Reserve | 2,85,51,448.08 | 3,63,31,143.26 |
| | 2) Interest Payable on Deposits | 18,05,239.00 | 16,04,520.00 |
| IV | Others Payable (Including Provisions) | 1,01,62,258.50 | 90,68,192.38 |
| | (i) Dividend Payable | 6,10,255.11 | 9,18,079.11 |
| | (ii) POS, Ecom Refund Payable | - | 11,055.98 |
| | (iii) Insurance Payable | 792.76 | 150.76 |
| | (iv) POS Settlement Account | 75,702.14 | 5,12,362.15 |
| | (v) TDS Payable | 3,36,414.00 | 2,32,316.56 |
| | (vi) Sundry Creditors | 13,66,523.51 | 15,83,210.06 |
| | (vii) Legal Fee Payable | 3,46,917.00 | 3,88,717.00 |
| | (viii) Income Tax Payable | 14,96,380.98 | 10,40,102.00 |
| | (ix) IMPS Settlement | 62,591.00 | 2,47,024.52 |
| | (x) TDS On Cash Withdrawals | 18,000.00 | - |
| | (xi) Staff Leave Encashment | 12,36,912.00 | 12,85,127.00 |
| | (xii) Share Suspense | - | 100.00 |
| | (xiii) Provisions For Audit Fee | 6,17,600.00 | 4,98,514.24 |
| | (xiv) Staff Proff. Tax Payable | 15,000.00 | 13,600.00 |
| | (xv) Staff Provident Fund Payable | 1,94,118.00 | 1,91,538.00 |
| | (xvi) PMFME Subsidy Payable | 13,43,554.00 | - |
| | (xvii) Nominal Member Fee | - | 3,400.00 |
| | (xviii) Differal Tax Payable [Special Reserve] | 16,72,000.00 | 14,22,000.00 |
| | (xix) LIC Premium payable | 17,605.00 | 20,535.00 |
| | (xx) Provision of Bonus & Ex - Gratia | 6,31,893.00 | 7,00,360.00 |
| | (xxi) NFS Issuer Settlement | 1,20,000.00 | - |
| | **Total** | **4,05,18,945.58** | **4,70,03,855.64** |

### Schedule 6 Cash and Balances with Reserve Bank of India

| | | | |
|---|---|---|---|
| I | **Cash In Hand (including foreign Currency Notes)** | **8,98,82,231.00** | **9,67,66,847.00** |
| II | **Balances with Reserve Bank of India** | **-** | **-** |
| | a) in Current Account | - | - |
| | b) in Other Account | - | - |
| | **Total (I and II)** | **8,98,82,231.00** | **9,67,66,847.00** |

### Schedule 7 Balances with Banks and Money at Call And Short Notice

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | **In India** | | |
| | **(i) Balances with Banks** | | |
| | a) In Current Accounts | 5,60,14,952.16 | 5,72,16,164.26 |
| | b) In other Deposit Accounts | - | - |
| | **(ii) Money At Call and Short Notice** | | |
| | a) With Banks | - | - |
| | b) With Other Institutions | - | - |
| | **Total (I + II)** | **5,60,14,952.16** | **5,72,16,164.26** |

### Schedule - 8 Investments

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | **Investments in India In** | | |
| | (i) Governments Securities | 1,00,32,28,967.00 | 95,39,99,959.00 |
| | (ii) Other Approved Securities | - | - |
| | (iii) Shares | 41,500.00 | 41,500.00 |
| | (iv) Units in Mutual Funds | 2,99,98,500.06 | |
| | (v) Debentures and Bonds | 8,41,84,415.00 | 10,08,23,115.09 |
| | (vi) Subsidiaries and / or joint ventures | - | - |
| | (vii) Other Bank Investment | 41,34,01,000.00 | 35,10,77,113.50 |
| | **Total** | **1,53,08,54,382.06** | **1,40,59,41,687.59** |

### Schedule - 9 Advances

| | | | |
|---|---|---|---|
| A | (i) Bills Purchased and Discounted | | |
| | (ii) Cash Credits, Overdrafts and Loans repayable and Demand | 11,00,59,068.48 | 75,09,48,326.00 |
| | (iii) Term Loans | 1,27,70,75,210.95 | 44,45,09,749.72 |
| | **Total** | **1,38,71,34,279.43** | **1,19,54,58,075.72** |
| | **of which** | | |
| B | (i) Secured By Tangible Assets | 1,26,51,63,041.47 | 1,13,95,16,566.84 |
| | b) Covered by Bank / Government Guarantees | - | - |
| | c) Unsecured | 12,19,71,237.96 | 5,59,41,508.88 |
| | **Total** | **1,38,71,34,279.43** | **1,19,54,58,075.72** |
| C | **Advances in India** | | |
| | (i) Priority Sectors | 97,73,42,000.00 | 1,00,57,63,270.00 |
| | (ii) Public Sector | - | - |
| | (iii) Banks | - | - |
| | (iv) Others | 40,97,92,279.43 | 18,96,94,805.72 |
| | **Total** | **1,38,71,34,279.43** | **1,19,54,58,075.72** |
| | **Grand Total** | **1,38,71,34,279.43** | **1,19,54,58,075.72** |

### Schedule - 10 Fixed Assets

| | | | |
|---|---|---|---|
| I | **Premises** | | |
| | (i) At cost as on 31st March of preceding year | 88,00,295.44 | 92,64,805.44 |
| | (ii) Additions during the year | - | - |
| | (iii) Deductions during the year | - | - |
| | (iv) Depreciation to date | 4,40,016.00 | 4,64,510.00 |
| | **Total** | **83,60,279.44** | **88,00,295.44** |
| II | **Other Fixed Assets (including Furniture and Fixtures)** | | |
| | (i) At cost as on 31st March of the preceding year | 2,37,83,553.11 | 2,16,79,275.58 |
| | (ii) Additions During The Year | 82,51,887.50 | 72,88,604.89 |
| | (iii) Deductions During The Year | 7,872.00 | 58,884.92 |
| | (iv) Depreciation To Date | 52,36,851.75 | 51,25,442.44 |
| | **Total** | **2,67,90,716.86** | **2,37,83,553.11** |
| | **Grand Total** | **3,51,50,996.30** | **3,25,83,848.55** |

### Schedule 11 - Other Assets

| | | | |
|---|---|---|---|
| I | Inter Office Branch Adjustments (net) | - | - |
| II | Interest Accured | | |
| | (i) Interest Receivable on NPA Advances | 2,85,51,448.08 | 3,65,03,130.26 |
| | (ii) Investment | 1,43,06,054.33 | 1,55,99,927.83 |
| | (iii) Other Bank Investment | 52,85,942.00 | - |
| III | Stamp Purchase | 63,328.00 | 53,680.00 |
| IV | Stationery Stock | 10,58,105.11 | 8,11,134.06 |
| V | Deposits (Anamat) | 6,97,710.00 | 6,97,710.00 |
| VI | E-com Settlement Account | - | 4,61,268.02 |
| VII | Prepaid Expenses | 14,09,949.00 | 4,12,409.00 |
| VIII | Sundry Debtors | 5,360.00 | 4,19,860.00 |
| IX | TDS on GST | 38,005.24 | 16,809.60 |
| X | Income Tax Refund | - | 6,97,939.00 |
| XI | NFS Issuer Settlement Account | - | 1,68,153.77 |
| XII | Acquirer Settlement Account | 6,55,100.00 | 3,65,056.00 |
| XIII | Deaf Receivable | 3,954.48 | 3,587.87 |
| XIV | IGST PAID | 11,312.94 | 5,642.94 |
| XV | SGST PAID | 8,87,598.92 | 13,78,371.21 |
| XVI | CGST PAID | 8,58,308.64 | 13,80,112.57 |
| XVII | Non-Banking Assets | 13,70,127.00 | 61,82,232.18 |
| XVIII | **Others (Building Revaluation Contra)** | **2,15,48,601.18** | **2,26,82,738.09** |
| | ***** Current Year Loss** | **-** | **-** |
| | **Total** | **7,67,50,904.92** | **8,78,39,762.40** |

### Schedule-12 Contingent Liabilities

| | | | |
|---|---|---|---|
| I | Claims Against the Bank Not Acknowledged As | - | - |
| II | Liability For Partly Paid Investment | - | - |
| III | Liability on Account of outstanding forward exchange | - | - |
| IV | Guarantees Given On behalf Of Constituents | | |
| | (a) In India | 1,23,14,000.00 | 1,00,89,000.00 |
| | (b) Outside India | | |
| V | Acceptance, Endorsements and Other Obligation | - | - |
| VI | Other Items For Which The Bank is Contingently | - | - |
| VII | DEAF Funds Transfer to RBI | 48,94,950.06 | 38,58,552.33 |
| | **Total** | **1,72,08,950.06** | **1,39,47,552.33** |

# Form B
## Profit and Loss Account For the Year Ended 31 MARCH 2025

| | | Schedule | As on 31.03.2025 (Current Year) | As on 31.03.2024 (Previous Year) |
|---|---|---|---|---|
| I | **INCOME** | | | |
| | Interest Earned | 13 | 22,69,55,001.84 | 20,36,11,419.98 |
| | Other Income | 14 | 1,98,92,683.70 | 1,39,30,180.76 |
| | **Total** | | **24,68,47,685.54** | **21,75,41,600.74** |
| II | **EXPENDITURE** | | | |
| | Interest Expended | 15 | 14,60,16,048.97 | 13,96,03,438.67 |
| | Operating Expenses | 16 | 7,81,80,184.47 | 6,75,68,201.15 |
| | Provisions and Contingencies | | | |
| | **Total** | | **22,41,96,233.44** | **20,71,71,639.82** |
| III | **Profit/Loss** | | | |
| | Net Profit/Loss (-) For the Year | | 2,26,51,452.10 | 1,03,69,960.92 |
| | Profit/Loss (-) Brought Forward | | - | - |
| | **Total** | | **24,68,47,685.54** | **21,75,41,600.74** |

### Schedule 13 Interest Earned

| | | | |
|---|---|---|---|
| I | Interest/Discount On Advances | 14,44,19,151.37 | 12,17,23,137.01 |
| II | Income On Investments | 6,25,07,907.01 | 5,83,67,246.02 |
| III | Interest on balances with Reserve Bank of India and other inter-bank funds | 2,00,27,943.46 | 2,35,21,036.95 |
| IV | Others | | |
| | **Total** | **22,69,55,001.84** | **20,36,11,419.98** |

### Schedule 14 - Other Income

| | | | |
|---|---|---|---|
| I | Commission, Exchange And Brokerage | 48,81,627.07 | 16,53,172.25 |
| II | Profit on Sales of Investment | 5,16,500.00 | 9,29,316.69 |
| III | Less Loss on sale of Investment | (10,05,000.00) | (47,31,750.00) |
| IV | Profit on Sales Mutual Funds | 30,54,474.87 | 17,12,624.81 |
| V | Dividend Received | 4,46,057.90 | 4,46,057.90 |
| VI | Other Income | 1,19,99,023.86 | 1,39,20,759.11 |
| | (i) Loan Recovery Charges Received | 1,64,400.85 | 1,76,406.22 |
| | (ii) Locker Rent Received | 3,33,585.94 | 3,22,956.26 |
| | (iii) Loan Processing fee | 16,62,828.03 | 11,79,993.28 |
| | (iv) Share Transfer fee | 500.00 | 1,072.00 |
| | (v) Miscellaneous Income | 21,165.15 | 5,49,898.47 |
| | (vi) Service Charges | 23,37,344.55 | 23,89,566.82 |
| | (vii) Gold Custody Charges | 10,94,433.76 | 9,83,306.66 |
| | (viii) Profit on Sale of other Assets | (7,872.00) | 70.00 |
| | (ix) CIBIL Charges | 2,24,502.86 | 1,31,977.17 |
| | (x) BDDR Return Back Provision | 58,55,292.00 | 25,38,377.23 |
| | (xi) IFR Return Back Provision | - | 56,47,135.00 |
| | (xii) Penal Charges Recover | 3,12,842.72 | - |
| | **Total** | **1,98,92,683.70** | **1,39,30,180.76** |

### Schedule 15 - Interest Expended

| | | | |
|---|---|---|---|
| | Interest on Deposits | 14,57,25,375.37 | 13,96,02,978.67 |
| | Interest on RBI/Inter-bank borrowings | 2,90,673.60 | 460.00 |
| | Others | - | - |
| | **Total** | **14,60,16,048.97** | **13,96,03,438.67** |

### Schedule 16 - Operating Expenses

| | | | |
|---|---|---|---|
| I | Payments To And Provisions For Employees | 2,10,14,891.00 | 1,78,66,376.00 |
| II | Rent, Taxes And Lighting | 59,70,051.39 | 42,19,194.70 |
| III | Printing And Stationery | 8,85,260.77 | 4,55,097.11 |
| IV | Advertisement And Publicity | 15,35,393.74 | 9,44,738.20 |
| V | Depreciation on Bank Property | 56,76,867.75 | 56,42,001.36 |
| VI | Board Meeting Allowances | 2,60,544.00 | 2,51,104.00 |
| VII | Auditors Fees And Expenses (Including Branch) | 15,28,375.16 | 8,90,500.00 |
| VIII | Legal Charges | 7,54,819.88 | 11,49,774.18 |
| IX | Postages, Telegrams, Telephones, Etc. | 5,98,697.48 | 3,33,477.86 |
| X | Repairs And Maintenance, AMC Chgs | 44,60,613.06 | 46,00,983.64 |
| XI | Insurance | 56,77,484.71 | 53,57,326.08 |
| XII | Amortization on Investment | 7,03,992.00 | 12,53,982.00 |
| XIII | **Provisions :-** | | |
| | Bad & Doubtful Debts | 40,30,005.90 | 64,15,000.00 |
| | Contingency Standard Asset Provisions | 10,00,000.00 | - |
| | Special Reserve U/S 36 (VIII) | 10,00,000.00 | 4,13,000.00 |
| | Mark to Market (IDR) | 29,46,158.10 | 56,47,135.00 |
| | Income Tax Paid | 84,47,939.00 | 56,32,387.00 |
| | Interest Reversal on NBA as per RBI IO | 39,58,105.18 | - |
| XIV | **Other Expenditure** | | |
| | (i) Staff & Director Training | 4,79,351.00 | 4,25,364.00 |
| | (ii) Bank Federation & Association Subscription | 1,93,447.00 | 1,39,710.00 |
| | (iii) AMC Paid | - | 41,253.60 |
| | (iv) Annual General Meeting Expenses | 3,84,846.02 | 3,26,899.00 |
| | (v) Other Chargew | 4,72,560.78 | 5,51,480.90 |
| | (vi) Refreshment | 7,38,655.00 | 4,83,703.00 |
| | (vii) Commission and Brokerage | 4,00,240.61 | 4,77,965.39 |
| | (viii) ATM Card Fee | 1,28,518.00 | 98,100.00 |
| | (ix) Travelling Expenses | 98,794.00 | 60,615.00 |
| | (x) Petrol & Fuel Expenses | 3,63,573.00 | 3,75,234.00 |
| | (xi) Sweeper Charges | 1,80,100.00 | 1,65,600.00 |
| | (xii) Employee Uniforms | 2,02,690.00 | 1,86,070.00 |
| | (xiii) Books & Periodicals | 605.00 | 11,907.00 |
| | (xiv) Bank Security Charges | 22,63,389.00 | 18,23,202.98 |
| | (xv) CIBIL Charges | 2,36,453.93 | 1,19,467.26 |
| | (xvi) Software Migration Integrat | 4,91,590.00 | 2,18,000.00 |
| | (xvii) ATM Transaction Fee | 4,26,600.74 | 4,08,224.96 |
| | (xviii) Recovery Expenses | 3,70,026.27 | 3,08,019.93 |
| | (xix) Branch inaugaration Exp | 2,99,545.00 | 2,75,307.00 |
| | **Total** | **7,81,80,184.47** | **6,75,68,201.15** |

**Chairman** Mr. N. D. Patil
**Vice-Chairman** Dr. Mr. S. M. Darekar
**Director** Mr. B. S. Pawar

**Chief Executive Officer**
Mr. D. M. Dhatrak

Place : Nashik
Date : 18/06/2025

M/S. Ulhas Borse & Co.
Chartered Accountants
FRN 127883W
Partner
M. No. 122811
UDIN - 25122811BMHVTL4139

## लेखापरिक्षकांचा अहवाल

(महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा कलम 81 (1) व नियम 69 अन्वये)

01) **वैधानिक लेखापरीक्षक म्हणून आर्थिक विवरणाचा अहवाल :**
आम्ही लोकनेते दत्ताजी पाटील सहकारी बँक लि., नाशिक या संस्थेचा सोबत जोडलेला दि. 31/03/2025 अखेरचा ताळेबंद व त्या दिवशी संपणाऱ्या आर्थिक वर्षाचे नफा तोटा पत्रक व लेखापरिक्षण केलेले आहे. ज्यात 7 शाखांच्या व्यवहाराचा व महत्त्वाचा लेखा विषयक धोरणांचा समावेश आहे.

02) **व्यवस्थापनाची आर्थिक विवरणपत्राची जबाबदारी :**
संस्थेची योग्य व रास्त आर्थिक परिस्थिती व भारतात सामान्यत: मान्य असलेल्या Accounting Standards नुसार आणि Banking Regulation Act 1949 तिसऱ्या शेड्युल्ड नुसार (जे सहकारी संस्थांना लागू आहे) तसेच या बाबतीत रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचना नाबार्ड यांनी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचना, तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा 1960 व महाराष्ट्र राज्य सहकारी नियम 1961 यानुसार आर्थिक पत्रके तयार करण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे. ह्या जबाबदारीत त्रुटींविरहित आर्थिक पत्रके तयार करण्याच्या संबंधित अंतर्गत व्यवस्थापनाची आखणी करून ते कार्यान्वित करणे व सुरळीत ठेवणे याचा समावेश होतो. सदर आर्थिक पत्रके ही कुठल्याही गैरव्यवहार व चुकीमुळे झालेल्या परिणामकारक अशा चुकींच्या माहितीपासून मुक्त असल्याची खात्री करणे ही व्यवस्थापनाची जबाबदारी आहे.

03) **लेखापरीक्षकाची जबाबदारी :**
सदर आर्थिक पत्रकाच्या लेखापरिक्षणावरून त्यावर अभिप्राय व्यक्त करण्याची जबाबदारी आमची आहे. Institute of Chartered Accountants of India ने जारी केलेल्या लेखापरिक्षण तत्त्वांनुसार आम्ही लेखापरिक्षण केले आहे. या दर्जानुसार असे अपेक्षित आहे की, आम्ही लेखापरिक्षणाचे नियोजन करून ते प्रत्यक्षात करताना मिळालेली आर्थिक पत्रके ही परिणामकारक अशा चुकीच्या माहितीपासून मुक्त असल्याची तर्कसंगतदृष्ट्या खात्री करावी.

04) लेखापरिक्षणामध्ये लेखापरिक्षणासंबंधित पुरावे गोळा करण्यासाठीच्या विविध पद्धतींचा समावेश होतो. सदर पद्धतींची निवड ही लेखापरिक्षकाचा अनुभव व परिणामकारक अशा चुकीच्या माहितीची शक्यता यावर अवलंबून आहे.
अशा जोखमीची पडताळणी करतांना लेखापरिक्षक आर्थिक पत्रके तयार करतांना त्यावर असलेले बँकेच्या असलेल्या अंतर्गत नियंत्रणाचा विचार करून लेखापरिक्षणाची कार्यप्रणाली ठरवली. जी त्या परिस्थितीत योग्य आहे. लेखापरिक्षणामध्ये आर्थिक पत्रकात दिलेली माहिती आणि रकमा यांच्या पुष्ट्यर्थ दिलेल्या पुराव्यांची अंशत: तपासणी करण्याचा समावेश होतो. लेखापरिक्षणामध्ये व्यवस्थापनाने अनुसरलेली हिशोबाची तत्त्वे आणि महत्त्वाचे अंदाज यांचा आढावा घेणे, तसेच दाखल केलेल्या सर्वसाधारण आर्थिक पत्रकाचे मूल्यमापन करणे यांचाही समावेश आहे.

05) आम्ही घेतलेले पुरावे हे आमच्या लेखापरिक्षणासाठी व आर्थिक पत्रकावर मत व्यक्त करण्यासाठी पुरेसे आहेत असा आम्हाला विश्वास आहे.

06) **अभिप्राय :**
आमच्या मते आणि आम्हाला मिळालेल्या माहिती व खुलाश्यानुसार सदर आर्थिक पत्रके व त्यावरील टिपण्यांसहित तसेच या बाबतीत रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचना, नाबार्ड यांनी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचना, तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा 1960 व महाराष्ट्र राज्य सहकारी नियम 1961 यानुसार आवश्यक असलेली माहिती देतात व भारतात मान्यताप्राप्त असलेल्या लेखा तत्वानुसार
1) ताळेबंदाच्या बाबतीत दि. 31/03/2025 अखेरची सत्य व रास्त आर्थिक स्थिती दर्शवितो.
2) नफा तोटा पत्रक दि. 31/03/2025 रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा रास्त नफा दर्शवितो.
3) बँकेचा ताळेबंद व नफा तोटा पत्रक हे बँकिंग रेग्युलेशन कायदा 1949 च्या तिसऱ्या परिशिष्टानुसार तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा 1960 व महाराष्ट्र राज्य सहकारी नियम 1961 नुसार बनविला गेला आहे.

07) **मी अहवाल देतो की :**
- आमच्या लेखापरीक्षणाच्या उद्देशांसाठी आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे, माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती माहिती व खुलासे मला उपलब्ध झालेले आहेत.
- आमच्या निदर्शनास आलेले संस्थेचे सर्व व्यवहार हे संस्थेच्या अधिकार कक्षेतील आहेत. (भाग अ, ब, क मधील शेऱ्यास पात्र राहून)
- माझ्या लेखापरीक्षणासाठी संस्थेच्या कार्यालयाकडून व तिच्या शाखांकडून आलेली विवरणपत्रे योग्य आहेत.

08) आमच्या मते व आम्ही केलेल्या लेखापरीक्षणाच्या आधारे बँकेचे कायद्यातील तरतुदीनुसार योग्य ती हिशोबी पुस्तके दप्तरी ठेवली आहेत. लेखांकन मानकांप्रमाणे ताळेबंदपत्रक आणि नफा आणि तोटा हिशेब यांचे अनुपालन माझ्या मताप्रमाणे योग्य आहे.

09) **मी आणखी पुढील अहवाल सादर करतो :**
- सन 2024-2025 चे ताळेबंद व नफा-तोटा पत्रके ही हिशोबी पुस्तकांशी मेळ साधतात.
- पुस्तकांची तपासणी केल्यानंतर बँकेने योग्य ती ताळेबंदपत्रक जी अधिनियमानुसार जरुरीची आहेत ती सर्व व्यवस्थित ठेवलेली आहेत.
- मी लेखापरीक्षण केलेल्या शाखांचे ताळेबंदपत्रक शाखा लेखापरीक्षकांनी केलेले असून, ते मला आवश्यक आहे त्याप्रमाणे आहे.
- सन 2024-25 या आर्थिक वर्षात बँकेस **‘अ’** वर्ग देण्यात आला आहे.

**उल्हास बोरसे आणि कंपनी करिता**
**चार्टर्ड अकौंटंट्स**
**फर्म नं. 127883W**

**सीए उल्हास एस. बोरसे**
**भागीदार**
**मे. नं. 122811**
**स्थळ : नाशिक**
**दि. 18/06/2025**
UDIN :- 25122811BMHVTL4139

STAMP

# राज्यस्तरीय जाहिरात एजन्सी फेडरेशनच्या अध्यक्षपदी रवी पवार



**पुणे (भ्रमर वृत्तसेवा) :-** महाराष्ट्रातील अॅडव्हर्टायझिंग एजन्सीजची राज्यस्तरीय शिखर संस्था असलेल्या फेम (फेडरेशन ऑफ अॅडव्हर्टायझिंग अॅण्ड मार्केटिंग एंटरप्रेनियर्स) ची सर्वसाधारण सभा संपन्न झाली.

यावेळी पुणे, कोल्हापूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, सांगली, सातारा, कोकण, जळगाव, अहिल्यानगर, सोलापूर आदी जिल्ह्यांतील जाहिरात एजन्सीजचे प्रतिनिधी, तसेच जिल्हा संघटनेचे सदस्य उपस्थित होते.

